# शिक्षक परिषद बैठक दि.०५/१०/२०१६ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | सहविचार सभा वेळेत होणेबाबत. | यापुढे सहविचार सभांचे आयोजन वेळेत घेण्यात येतील. तथापि, वरिष्ठ कार्यालयाच्या बैठका, मा. उच्च न्यायालयीन प्रकरणे व अन्य अपरिहार्य कारणांमुळे ऐनवेळी नियोजनात बदल करावा लागतो. | शिक्षण उपसंचालक / शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| २. | सन २०१५-१६ च्या संचमान्यतेनुसार समायोजनाची सद्य:स्थिती. | याबाबत शासन / वरिष्ठ कार्यालय यांच्याकडून प्राप्त आदेश / सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे. सिंधुदुर्ग वगळता इतर जिल्ह्यांत कार्यवाही झाली आहे. काही तक्रारी असल्यास त्याबाबत निवेदन देण्यात यावे, अशा मा.शिक्षण संचालक यांनी सूचना दिल्या आहेत. दुरूस्तीबाबत फेरविचार सुरू आहे. शासन / वरिष्ठ कार्यालयाच्या सूचना / आदेशानुसार अतिरिक्त शिक्षकांचे समावेशन होत नाही, तोपर्यंत (माहे नोव्हेंबर, २०१६ अखेर) जुन्या शाळेतून वेतन अदा करण्यात यावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ३. | पी.एफ. स्लिपा वेळेत मिळण्याबाबत. | वेतन पथक यांनी त्यांच्या स्तरावर सर्व लेखे पूर्ण करून मुदतीत भ.नि.नि. स्लिपांचे वितरण शाळांना करणे आवश्यक आहे. तसेच ना-परतावा प्रकरणे विहित कालमर्यादेत निर्गत करावीत. विविध शैक्षणिक संघटनांकडून हा प्रश्न वारंवार उपस्थित केला जात असल्याने शिक्षणाधिकारी यांनी वेतन पथकास आवश्यक त्या सूचना देवून कामकाज पूर्ण करावे. सध्या प्रलंबित असलेल्या सर्व भ.नि.नि. स्लिपांचे वितरण माहे डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण होईल, याची सर्व जिल्ह्यांनी दक्षता घ्यावी. शैक्षणिक संघटनांकडून पुढील बैठकीवेळी हा प्रश्न उपस्थित होणार नाही, याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी. याविषयी केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास लेखी अवगत करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | माहे डिसेंबर, २०१६ अखेर |
| ४. | ज्युनियर कॉलेज अर्धवेळ शिक्षकांच्या प्रलंबित मान्यतेबाबत. | सन २०१५-१६ अखेर कोणत्याही अर्धवेळ शिक्षकांच्या मान्यता या कार्यालयाच्या स्तरावर प्रलंबित नाहीत. सन २०१६-१७ च्या संचमान्यतेचे काम सुरू आहे. याविषयी ऑनलाईन प्रणालीत काही अडचणी असल्यास संघटनेने वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करावा. | संघटना स्तरावर | --- |
| ४. | सांगली जिल्ह्यातील प्र.शिक्षणाधिकारी श्री.लोंढे प्रकरणातील कोर्टातील न्यायप्रविष्ठ शिक्षकांचे वेतनाबाबत. | मा. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | एटीडी मधून एएम स्केल मान्यता मिळणेसंदर्भात मा.शिक्षणाधिकारी मा.शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे मार्गदर्शन मागविले आहे, असे सांगतात. तरी या संदर्भात आपण केलेले मार्गदर्शनबाबत माहिती मिळावी. | बैठकीत चर्चा झालेनुसार प्रचलित नियम / शासन निर्णयातील तरतुदी यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ६. | न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होणेबाबत. | न्यायालयीन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. प्रचलित शासन धोरणाशी विसंगत न्यायालयीन निर्णय असल्यास अशा प्रकरणी वरिष्ठ कार्यालय / शासन यांचेकडून मार्गदर्शन घेवून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ७. | बदली मान्यताबाबत. | बदली मान्यतेसाठी प्रस्ताव वेळेत कार्यालयात दाखल झाल्यास त्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी तात्काळ बदली मान्यता द्यावी. तसेच माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे बदलीचे अधिकार संस्थेला आहेत. शैक्षणिक सत्राच्या सुरूवातीला बदली करण्यात यावी. सत्राच्या मध्यात बदली करण्यात येवू नये. आवश्यकते-प्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी जिल्ह्यातील शाळा / संस्था यांना सूचना द्याव्यात. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ८. | आयसीटी लॅब व निदेशक यांच्या प्रश्नासंदर्भात. | मुख्याध्यापकांनी लॅबचे मासिक अहवाल वेळेत सादर करावेत. तसेच लॅबमधील त्रुटींची मासिक अहवालात नोंद घ्यावी. | मुख्याध्यापक स्तरावर | --- |
| ९. | शिक्षकांना सेवानिवृत्ती दिवशी पेन्शन सुरू व्हावी व फंडाची रक्कम मिळावी. | शिक्षक सेवानिवृत्त होण्यापूर्वी ६ महिनेअगोदर सेवानिवृत्ती प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करणेबाबत वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. प्रस्ताव कालमर्यादेत सादर केल्यास पेन्शन वेळेत मिळू शकेल. फंडाचा प्रस्ताव तीन महिने अगोदर फंड वर्गणी बंद करून सादर करावेत. | मुख्याध्यापक / शिक्षणाधिकारी / वेतनपथक स्तरावर | --- |
| १०. | इंग्रजी, गणित व विज्ञान या पदांच्या मान्यताबाबत. | शासन निर्णय दि.०४/०९/२०१३ अन्वये शासनमान्य पदांबाबत वेळेत कार्यवाही न झाल्यामुळे मा. आयुक्त शिक्षण यांच्या परवानगीनंतर पदमान्यतेबाबत कळविण्यात येईल. | --- | --- |
| ७ | वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी कार्यवाहीबाबत. | प्रलंबित प्रकरणांबाबत शिक्षणाधिकारी यांनी कॅम्प घ्यावा. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| १३ | वैयक्तिक प्रकरणे. | शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक प्रकरणे तात्काळ निर्गत करावीत. संघटना स्तरावरून वारंवार विचारले जाणारे वैयक्तिक प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे. बैठकीत चर्चा झालेनुसार वैयक्तिक प्रकरणांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी. तेच तेच वैयक्तिक प्रश्न बैठकीत विचारले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |

**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग कोल्हापूर**